RNI No. MAHBIL /2009/31733

सत्यमेव जयते

# महाराष्ट्र शासन राजपत्र

## असाधारण भाग चार-अ

वर्ष ११, अंक १३६(३)] गुरुवार, ऑक्टोबर ३०, २०२५/कार्तिक ८, शके १९४७ [पृष्ठे ५, किंमत : रुपये १५.००

**असाधारण क्रमांक ४७५**

### प्राधिकृत प्रकाशन

**महाराष्ट्र शासनाने केंद्रीय अधिनियमांन्वये तयार केलेले**
**(भाग एक, एक-अ आणि एक-ल यांमध्ये प्रसिद्ध केलेले नियम व आदेश यांव्यतिरिक्त) नियम व आदेश.**

### महिला व बाल विकास विभाग

नवीन प्रशासन भवन, मंत्रालय, मुंबई ४०० ०३२, दिनांक ३० ऑक्टोबर, २०२५.

### अधिसूचना

**भारताचे संविधान.**

क्रमांक मबाआ-२०२२/प्र.क्र.६१/का-७.—भारताच्या संविधानाच्या अनुच्छेद ३०९ च्या परंतुकान्वये प्रदान करण्यात आलेल्या अधिकारांचा वापर करून आणि त्याबाबतीत करण्यात आलेले सर्व विद्यमान नियम, आदेश व अनुदेश अधिक्रमीत करून महाराष्ट्राचे राज्यपाल याद्वारे, महाराष्ट्र शासनाच्या महिला व बाल विकास विभागाच्या प्रशासकीय नियंत्रणाखालील महिला व बाल विकास आयुक्तालयाच्या अधिपत्याखालील **संरक्षण अधिकारी, गट-ब (अराजपत्रित) व संरक्षण अधिकारी (कनिष्ठ), गट-क** मधील पदांचे सेवाप्रवेशाचे विनियमन करणारे पुढील नवीन नियम तयार करीत आहेत :—

१. या नियमांना, महिला व बाल विकास आयुक्तालयाच्या अधिपत्याखालील **संरक्षण अधिकारी, गट-ब (अराजपत्रित) व संरक्षण अधिकारी (कनिष्ठ), गट-क** या पदांचे सेवाप्रवेश नियम, २०२५ असे म्हणावे. सदर नियम **शासन राजपत्र** प्रसिध्द झाल्याच्या दिनांकापासून अंमलात येतील.

२. या नियमांमध्ये, संदर्भानुसार दुसरा अर्थ अपेक्षित नसेल तर,—

(क) "**नियुक्ती प्राधिकारी**" यांचा अर्थ आयुक्त, महिला व बाल विकास असा आहे.

(ख) "**आयुक्तालय**" याचा अर्थ महिला व बाल विकास विभागाच्या अधिपत्याखालील महिला व बाल विकास आयुक्तालय असा आहे.

(ग) "**पदवी**" याचा अर्थ, संविधानिक विद्यापीठाची कोणत्याही शाखेतील पदवी किंवा शासनाने त्याच्याशी समतुल्य म्हणून घोषित केलेली अन्य कोणतीही अर्हता असा आहे.

(घ) "**विभाग**" याचा अर्थ भारतीय संविधानाच्या अनुच्छेद-१६६ अन्वये बनविलेल्या महाराष्ट्र शासन कार्यनियमावलीच्या पहिल्या अनुसूचीमध्ये विनिर्दिष्ट केलेला महिला व बाल विकास विभाग असा आहे.

(ड) “**पदोन्नतीसाठी पात्रता**” याचा अर्थ, सामान्य प्रशासन विभागाने वेळोवेळी निर्गमित केलेल्या नियम, शासन निर्णय किंवा आदेशाव्दारे पदोन्नतीसाठी विहित केलेल्या अटी व शर्ती नुसार पात्रता असा आहे.

(च) “**शासन**” याचा अर्थ महाराष्ट्र शासन असा आहे.

(छ) “**निवड समिती**” याचा अर्थ संरक्षण अधिकारी (कनिष्ठ) (गट क) या पदांवरील सरळसेवा भरती करीता उमेदवारांच्या निवडीच्या प्रयोजनार्थ महिला व बाल विकास विभागाने वेळोवेळी गठीत करण्यात आलेली समिती असा आहे.

३. **संरक्षण अधिकारी, गट-ब (अराजपत्रित)**

आयुक्तालयातील संरक्षण अधिकारी, गट-ब (अराजपत्रित) या पदावरील नियुक्ती ही आयुक्तालयातील संरक्षण अधिकारी (कनिष्ठ), गट-क हे पद धारण करणाऱ्या व या पदावर तीन वर्षापेक्षा कमी नसेल इतकी नियमित सेवा करणाऱ्या व्यक्तींमधून ज्येष्ठतेनुसार पदोन्नतीसाठी पात्रता धारण करणाऱ्या सुयोग्य व्यक्तीच्या पदोन्नतीव्दारे नियुक्ती प्राधिकाऱ्याच्या मान्यतेने करण्यात येईल.

४. **संरक्षण अधिकारी (कनिष्ठ) (गट-क)**

आयुक्तालयातील संरक्षण अधिकारी (कनिष्ठ) (गट-क) या पदावरील नियुक्ती ही निवड समितीव्दारे घेण्यात येणाऱ्या स्पर्धात्मक परीक्षेच्या निकालाच्या आधारे शिफारस करण्यात आलेल्या उमेदवारांमधून खालील निकषांची पूर्तता करण्याऱ्या उमेदवाराची नामनिर्देशनाने, नियुक्ती प्राधिकाऱ्यांच्या मान्यतेने करण्यात येईल.

**(क) वयोमर्यादा—**

(१) किमान वयोमर्यादा- सदर पद भरतीच्या जाहिरातीत नमूद केलेल्या अर्ज स्वीकृतीच्या अंतिम दिनांकास अठरा वर्ष पूर्ण असावे.

(२) कमाल वयोमर्यादा- सदर पद भरतीच्या जाहिरातीत नमूद केलेल्या अर्ज स्वीकृतीच्या अंतिम दिनांकास अमागास प्रवर्गातील व्यक्तीचे वय अडतीस वर्ष पूर्ण व मागास प्रवर्गातील व्यक्तींचे वय ४३ वर्ष पूर्ण पेक्षा अधिक नसावे.

**(ख) शैक्षणिक अर्हता–** कोणत्याही विषयातील पदवी धारण करणारी व्यक्ती.

५. नियम ४ येथे नमूद केलेल्या पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने नियमानुसार “विभागीय परीक्षा” ३ संधीत उत्तीर्ण व्हावे लागेल किंवा प्रचलित नियमानुसार “विभागीय परीक्षा” उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळणे आवश्यक राहील, अन्यथा विहित मुदतीनंतर विभागीय परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय राहणार नाही. तसेच वरिष्ठ पदावर पदोन्नती अनुज्ञेय राहणार नाही.

६. नियम ४ येथे नमूद पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने हिंदी भाषा परीक्षा व मराठी भाषा परीक्षा या दोन्ही परीक्षांसंदर्भात शासनाने वेळोवेळी केलेल्या नियमांनुसार सदर दोन्ही भाषा परीक्षा उत्तीर्ण केली असणे, अथवा या दोन्ही भाषा परीक्षा उत्तीर्ण होण्यापासून सूट मिळविलेली असणे आवश्यक राहील किंवा सदर दोन भाषा परीक्षा नियुक्तीपूर्वी उत्तीर्ण केलेल्या नसतील तर, दोन्ही भाषा परीक्षा नियमात नमूद केलेल्या विहित मुदतीत सदर दोन्ही भाषा परीक्षा उत्तीर्ण होणे आवश्यक राहील अन्यथा विहित मुदतीनंतर परीक्षा उत्तीर्ण होईपर्यंत वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय राहणार नाही. तसेच वरिष्ठ पदावर पदोन्नती अनुज्ञेय राहणार नाही.

७. नियम ४ येथे नमूद पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने संगणक अर्हता प्रमाणपत्रासंदर्भात शासनाने वेळोवेळी केलेल्या नियमांनुसार, संगणक अर्हता प्रमाणपत्र धारण करणे अथवा सदर प्रमाणपत्र धारण करण्यापासून सूट मिळविलेली असणे आवश्यक राहील, संगणक अर्हता प्रमाणपत्र धारण केलेले नसल्यास, याबाबतच्या नियमात नमूद केलेल्या विहित मुदतीत सदर प्रमाणपत्र धारण करणे आवश्यक राहील. अन्यथा संगणक प्रमाणपत्र धारण करेपर्यंत वार्षिक वेतनवाढ अनुज्ञेय राहणार नाही. तसेच वरिष्ठ पदावर पदोन्नती अनुज्ञेय राहणार नाही.

८. **लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन—**

(एक) नियम ४ येथील पदावर नामनिर्देशनाद्वारे नियुक्त होणाऱ्या व्यक्तीने महाराष्ट्र नागरी सेवा (लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन) नियम, २००५ मधील तरतुदीनुसार व त्याबाबत वेळोवेळी करण्यात येणाऱ्या नियमांनुसार नियुक्तीच्या वेळी लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापन सादर करणे आवश्यक राहील.

(दोन) लहान कुटुंबाचे प्रतिज्ञापनामध्ये जर अपत्यसंख्या दोनपेक्षा अधिक असल्याचे नमूद केल्याचे निदर्शनास आल्यास, संबंधित उमेदवार शासकीय नियुक्तीसाठी अपात्र राहील.

(तीन) एखाद्या व्यक्तीची शासकीय सेवेत नियुक्ती झाल्यानंतर, जर नियुक्तीच्या वेळी किंवा त्यानंतर त्याला दोनपेक्षा जास्त अपत्ये असल्याचे सिद्ध झाले, तर ती व्यक्ती शासन सेवेकरिता अनर्ह राहील.

९. नियम ३ व ४ मध्ये नमूद केलेल्या पदावर पदोन्नतीने किंवा नामनिर्देशनाने नियुक्त झालेला व्यक्ती महाराष्ट्र राज्यात कोठेही बदलीसाठी पात्र असेल.

१०. नियम ३ व ४ मध्ये नमूद केलेल्या पदावर पदोन्नतीने किंवा नामनिर्देशनाने नियुक्त झालेल्या व्यक्तीने शासकीय सेवेतील नियुक्तीसाठी या नियमांद्वारे विहित करण्यात आलेल्या अटी व शर्तींची पूर्तता करणे आवश्यक आहे. सदर नियमांनुसार शासकीय सेवेत नियुक्ती झाल्यानंतर संबंधित शासकीय कर्मचाऱ्यास, शासकीय सेवेच्या कालावधीत, महाराष्ट्र नागरी सेवा नियम, तसेच सेवाविषयक बाबींसंदर्भात राज्य शासनाने वेळोवेळी अधिनियम/ अधिसूचना/शासन निर्णय/ शासन आदेशाद्वारे निर्गमित केलेले अन्य नियम लागू राहतील.

महाराष्ट्राचे राज्यपाल यांच्या आदेशानुसार व नावाने,

**वि. रा. ठाकूर,**
शासनाचे सहसचिव.

## WOMEN AND CHILD DEVELOPMENT DEPARTMENT

New Administrative Building, Mantralaya,
Mumbai 400 032, dated 30th October, 2025.

*NOTIFICATION*

CONSTITUTION OF INDIA.

No.MBA-2022/C.R.61/D-VII.—In exercise of the powers conferred by the proviso to article 309 of the Constitution of India, and in supersession of all the existing rules, orders or instruments made in this behalf, the Governor of Maharashtra is hereby pleased to make the following rules regulating recruitment to the post of Protection Officer Group-B (Non-Gazetted) and Protection Officer (Junior), Group-C, under the administrative control of the Women and Child Development Department of Government of Maharashtra, namely :—

1. These rules may be called the Protection Officer, Group-B (Non Gazetted) and Protection Officer (Junior), Group-C under the administrative control of the Women and Child Development Department (Recruitment) Rules, 2025.

2. In these rules, unless the context requires otherwise :—

(*a*) **"Appointing Authority"** means the Commissioner, Women and Child Development;

(*b*) **"Commissionerate"** means the Commissionerate of Women and Child Development, under the administrative control of Women and Child Development Department of the Government of Maharashtra;

(*c*) **"Degree"** means degree of Discipline of statuary university or any other qualification declare by the Government to be equivalent thereto;

(*d*) **"Department"** means the Department of Women and Child Development Department of the Government of Maharashtra;

(*e*) **"Eligibility for promotion"** means the eligibility for promotion in accordance with the terms and conditions specified in the rules, resolutions or order issued by the General Administrative Department of the Government, from time to time;

(*f*) **"Government"** means the Government of Maharashtra;

(*g*) **"Selection Committee"** means the Committee constituted by the Women and Child Development Department, from time to time, for the purpose of selection of candidates for direct recruitment to the post of the Protection Officer (Junior) (Group-C) in the Commissionerate.

3. **Protection Officer, Group-B (Non-Gazetted)**

Appointment to the Post of Protection Officer (Group B) (Non-Gazetted) under the Commissionerate shall be made by promotion of a suitable person having eligibility for promotion on the basis of seniority from amongst the persons holding the post of Protection Officer (Junior) (Group-C) in the said office and having not less than three years regular and continuous service on the said post.

4. **Protection Officer (Junior) (Group-C)**

Appointment to the post of Protection Officer (Junior) (Group-C) under the Commissionerate, shall be made by Nomination from amongst the Candidates recommended by the selection committee on the basis of result of Competitive Examination conducted by the Selection Committee, who fulfils the following criteria, namely :—

**(I) Age Limit—**

(*a*) Lower Age Limit—Eighteen years of age should be completed on the last date of receipt of applications as per the advertisement for recruitment to the said post.

(*b*) Upper Age Limit—Thirty-eight years of age completed for the persons not belonging

to reserved categories and forty-three years of age for the persons belonging to reserved categories as on the last date of receipt of applications as per advertisement for recruitment to the said post.

**(II) Minimum Educational Qualification** — A person holding a degree.

5. A person appointed to the post mentioned in rule 4 by nomination, shall be required to pass the prescribed Departmental Examination for the post, within the three attempts, unless he has been exempted from passing that examination. If such person does not pass the prescribed Departmental Examination within the prescribed time limits, then he shall not be eligible for annual increment or for the promotion, until the person passes the said examination or has been exempted from passing the Examination.

6. A person appointed to the mentioned in rule 4 by nomination shall pass the Marathi and Hindi Languages examinations as per the rules made in that behalf by the Government, from time to time, within the prescribed time limit after appointment, unless he has already passed the said examinations or he has been exempted from passing those examinations. He shall not be eligible for annual increment or promotion to the next promotional post until he passed those examinations.

7. A person appointed to the post mentioned in rule 4 by nomination shall possess a Certificate of Computers Operations prescribed by Government, from time to time, within the prescribed time limit after appointment, unless he has been exempted from possessing such Certificate, otherwise he shall not be eligible for annual increment or promotion to the next promotional post until he possesses such certificate.

8. **Affidavit of small family—**

(1) A person recommended for appointment by nomination to the post mentioned in rules 4 shall submit a declaration of Small Family as per the provision of the Maharashtra Civil Services (Small Family Declaration) Rules, 2005 or any other rules, orders or any instruments issued in this behalf by the Government, from time to time.

(2) A person having more than two children on the date of submission of Declaration of small family shall be disqualified for the appointment in Government Service.

(3) After appointment of a person in the Government Service, if it is proved that he has more than two children at the time of appointment or thereafter, then he shall be disqualified for continuing on the said post in the Government Service.

9. A person appointed by nomination or promotion on the post mentioned in rules 3 and 4 shall be liable to be transferred anywhere in the State of Maharashtra.

10. The terms and condition specified by the Government, in any rules, or resolution issued by Government from time to time, before or subsequent to the appointment of any Government Servant shall also be applicable to the person appointed on the post mentioned in rules 3 and 4.

By order and in the name of the Governor of Maharashtra,

V. R. THAKUR,
Joint Secretary to Government

ON BEHALF OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATION, PRINTED AND PUBLISHED BY DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE, PRINTED AT GOVERNMENT CENTRAL PRESS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004 AND PUBLISHED AT DIRECTORATE OF GOVERNMENT PRINTING, STATIONERY AND PUBLICATIONS, 21-A, NETAJI SUBHASH ROAD, CHARNI ROAD, MUMBAI 400 004. EDITOR : DIRECTOR, RUPENDRA DINESH MORE.